।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४१ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

साप्ताहिक

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारूती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४२ वे नवीन वर्ष २१ वे | रविवार दि.१० नोव्हेंबर २०२४ पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक ४२ वा


## आज सांगोल्यात उध्दव ठाकरे यांची तोफ धडाडणार!

### महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार दिपकआबांसाठी घेणार प्रचार सभा





सांगोला : शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे प्रचाराच्या मैदानात उतरले आहेत. कोल्हापूर येथे महालक्ष्मीचे दर्शन घेऊन त्यांनी विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा प्रारंभ केला आहे. रविवार दि.१० नोव्हेंबर रोजी दु. ३.०० वाजता सांगोला शहरातील न्यू इंग्लिश स्कूलच्या मैदानावर महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार दिपकआबा साळुंखे पाटील यांच्यासाठी शिवसेना पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे प्रचार सभा घेऊन महाविकास आघाडीतील कार्यकर्त्यांना आणि शिवसैनिकांना मार्गदर्शन करणार आहेत.

सांगोला विधानसभा मतदारसंघातून शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडून माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांना उमेदवारी दिली आहे. रविवार दि.१० नोव्हेंबर रोजी दुपारी ३.०० वाजता सांगोला शहरातील न्यू इंग्लिश स्कूलच्या मैदानावर महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार दिपकआबा साळुंखे पाटील यांच्यासाठी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे प्रचार सभा घेणार आहेत. या पार्श्वभूमीवर माजी मुख्यमंत्री उद्धवसाहेब ठाकरे यांच्या दौऱ्याकडे आणि भाषणाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यांच्या सभेची जय्यत तयारी सुरू असून सभेस येणाऱ्या गर्दीला कोणत्याही प्रकारे त्रास होणार नाही, अशा पद्धतीने नियोजन करण्यात येत आहे.

तरी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व महाविकास आघाडीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख संभाजी शिंदे, काँग्रेसचे जेष्ठ नेते पी.सी. झपके, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष डॉ. धनंजय पवार व महाविकास आघाडी सांगोला तालुका यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## महायुतीचा आघाडी धर्म पाळून आ.शहाजीबापू पाटील यांना प्रचंड मतांनी विजयी करणार : राजाभाऊ सरवदे

### कविराज मंगल कार्यालयातील बैठकीस आरपीआय कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



सांगोला : प्रतिनिधी सन २०१९ मध्ये सांगोला विधानसभा मतदार संघाचे उमेदवार आमदार शहाजीबापू पाटील यांना रिपब्लिक पार्टी ऑफ इंडियाचा (आठवले गट) जाहीर पाठिंबा देण्यात आला होता त्यावेळी आमदार शहाजीबापू पाटील हे ७६८ मतांनी विजयी झाले. सन २०२४ मध्येही आमदार शहाजीबापू पाटील हे महायुतीकडून सांगोला विधानसभा मतदार संघातून निवडणूक लढवत आहेत. रिपब्लिक पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष नाम. रामदास आठवले साहेब यांच्या आदेशानुसार यावेळेसही आमदार शहाजीबापू पाटील यांना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचा जाहीर पाठिंबा देण्यात येत आहे. पाठिंबाचे पत्र ही देण्यात येत असल्याची घोषणा रिपब्लिक पार्टी ऑफ इंडियाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांनी सांगोला येथे केली.

सांगोला तालुक्यातील आरपीआयचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांना आमदार शहाजीबापू पाटील यांनी सोबत घेऊन निवडणूक प्रचार यंत्रणा सक्षमपणे राबवावी. त्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल. या निवडणुकीतही महायुतीचा आघाडी धर्म पाळून आमदार शहाजीबापू पाटील यांना सांगोला विधानसभा मतदारसंघातून प्रचंड मतांनी विजयी करणार असल्याचा ठाम विश्वास आरपीआयचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांनी सांगोला येथे व्यक्त केला. सांगोला येथे आरपीआयची व आमदार शहाजीबापू पाटील यांची निवडणुकीच्या अनुषंगाने शुक्रवार दिनांक ८ ऑगस्ट रोजी बैठक संपन्न झाली. यावेळी महाराष्ट्र राज्य संघटक सुनील सर्व गोड, महाराष्ट्र संघटक बापूसाहेब जगताप, पश्चिम महाराष्ट्र सरचिटणीस जितेंद्र बनसोडे, जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले, जिल्हा सरचिटणीस रवी गायकवाड, अकरा तालुक्याचे अध्यक्ष, जिल्हा पदाधिकारी, तसेच पश्चिम महाराष्ट्र पदाधिकारी व सांगोला तालुक्यातील आरपीआयचे पदाधिकारी या बैठकीवेळी उपस्थित होते.

यावेळी महायुतीचे उमेदवार आमदार शहाजीबापू पाटील म्हणाले, आरपीआय पक्षाची यापूर्वीच्या निवडणुकीत साथ लाभल्याने विजय झाला. यापुढेही पक्षाने मला साथ द्यावी. भविष्यात सर्व निवडणुका एकत्रीतपणे लढवण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. आरपीआयचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरोदे यांनी आरपीआय पक्षाचा जाहीर पाठिंबा दिल्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. यावेळी आमदार शहाजीबापू पाटील यांनी सांगोला विधानसभा मतदारसंघात केलेल्या विकास कामांची अहवाल पुस्तिका प्रकाशन कार्यक्रम महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी आरपीआयचे तालुका अध्यक्ष खंडू सातपुते यांनी सर्वांचे स्वागत करीत कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमासाठी आरपीआयचे आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आबासाहेबांचा राजकीय वारसदार म्हणणाऱ्यांनी आत्मपरीक्षण करावे-डॉ.अनिकेत देशमुख



सांगोला : प्रतिनिधी काही लोक म्हणतात आबासाहेबांच्या विचारांचे आम्ही वारसदार आहोत मला त्यांना विचारायचे आहे की आपण स्वतःचा इतिहास तपासावा, आपल्या राजकीय जीवनामध्ये ज्या ज्या पक्षाने, घराण्यांनी आपणास राजकीय पाठबळ दिले, ज्यांना आपण पित्या समान मानले त्यांचे आपण वारसदार होऊ शकला नाही, स्वतःच्या स्वार्थासाठी दररोज पक्ष बदलणाऱ्यांनी यापुढे राजकीय वारसा संदर्भात बोलताना विचार करावा.आपणास व आपल्या कार्यकर्त्यांना आबासाहेबांनी ग्रामपंचायतीपासून पंचायत समिती, जिल्हा परिषद ते थेट विधानभवनापर्यंत पोहोचवले, आपण आबासाहेबांची कशाप्रकारे सेवा केली ते स्व.आबासाहेब, आम्ही कुटुंबिय व सर्व जनता जाणते आहे.आबासाहेब यांनी तालुक्यांसाठी निस्वार्थपणे सबंध आयुष्य घालवले त्यांचा वसा व वारसा पुढे चालण्यासाठी डॉ. बाबासाहेब देशमुख यांना विजयी करावे असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे चिटणीस मंडळाचे सदस्य डॉ. अनिकेत देशमुख यांनी केले.

सांगोला विधानसभा मतदार संघाचे महाविकास आघाडी-इंडिया अलायन्स पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार डॉ. बाबासाहेब आण्णासाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ शुक्रवार दि.८ रोजी सांगोला तालुक्यातील मौजे भोपसेवाडी येथे कॉर्नर सभा संपन्न झाली. यावेळी डॉ. अनिकेत देशमुख बोलत होते.

यावेळी काँग्रेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष राजकुमार पवार म्हणाले की, सांगोला तालुक्यातील काँग्रेस पक्ष हा डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. आम्ही डॉ. बाबासाहेब देशमुख यांना विजयी करण्यासाठी जीवाचे रान करणार आहोत. डॉ.बाबासाहेब देशमुख म्हणाले की, काही लोक नागरिकांना पैशाचे आमिष दाखवून व धमकावून मते मिळवण्याच्या प्रयत्नात आहेत. गेल्या ५ वर्षात टक्केवारी मिळविण्यासाठी काही कामे हाती घेतली. कामे निकृष्ट करून अमाप माया दोघांनी मिळवली आणि माणसाचे जीवनमान उंचावण्यासाठी आवश्यक असणाऱ्या परंतु त्यांना टक्केवारी न मिळणाऱ्या शिक्षण, आरोग्य, शेती, दुध व्यवसाय याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. वाळू माफिया व अवैध व्यवसाय करणाऱ्यांना पाठबळ दिले त्यामुळे तरुणांना व्यसने लागून शांतता असणारा तालुका अशांत झाला. सर्वसामान्य माणसांमध्ये भीतीचे वातावरण तयार झाले आहे म्हणून आपले जीवन भयमुक्त जगता यावे, आबासाहेबांचा पुरोगामी विचार टिकावा, तालुक्याचा सर्वांगीण विकास करण्यासाठी २० तारखेला माझ्या नावासमोरील शिट्टी या चिन्हा समोरील बटन दाबून पुन्हा एकदा सांगोला तालुक्यात लाल बावटा फडकवावा असे आवाहन केले.

यावेळी प्रस्ताविकामध्ये महेश बंडगर यांनी स्व. भाई गणपतरावजी देशमुख यांनी भोपसेवाडी गावच्या विकासासाठी पाच समाज मंदिरे, १६ सिमेंट बंधारे, ३ शाळा रस्ते, पाणीपुरवठा योजना, घरोघरी विद्युत पुरवठा अशी अनेक कामे केली असून त्यामधून उतराई होण्यासाठी नेहमीप्रमाणे शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार डॉ.बाबासाहेब देशमुख यांना गावातून मोठे मताधिक्य देऊन स्व. आबासाहेबांना श्रद्धांजली अर्पण करूया असे आवाहन केले. यावेळी सभापती मायाप्पा यमगर, सुनील कोरे, अनिल नरळे, आनंदराव यमगर, बाळू कोरे, तानाजी नरळे, दत्तू माळी, श्रीपती वगरे, बबन गावडे, हरी कोळेकर, काका बंडगर, महादेव वसमळे यांच्यासह अनेक कार्यकर्ते महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# आगामी पाच वर्षात तालुक्याचा कायापालट करु : आ.शहाजीबापू पाटील

## सांगोला तालुक्यातील चिणके,वझरे,अनकढाळ,राजुरी,ह.मंगेवाडी,जुजारपूर, गुणापावाडी,जुनोनी,पाचेगाव खुर्द,चोपडी,नाझरा येथे प्रचारसभा संपन्न



सांगोला : प्रतिनिधी राज्यातील महायुती सरकारमधील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तालुक्याच्या विकासासाठी ५ हजार कोटीहून अधिक निधी दिल्याने गेल्या पाच वर्षात तालुक्यातील शेतीच्या व पिण्याचा पाण्याचा प्रश्न सोडवण्यात मोठे यश आले. तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील राहिल्याने तालुक्याचा परिपूर्ण विकास होण्यास मदत झाली. माझी राजकीय जीवनातील शेवटची निवडणूक असून आगामी पाच वर्षाच्या काळात तालुक्यासाठी मोठी एमआयडीसी, मेडिकल कॉलेज ,इंजिनिअरिंग कॉलेज, व्यावसायिक कॉलेज तसेच मोठमोठ्या कंपन्या तालुक्यात आणून तालुक्यातील बेरोजगार तरुणांच्या हाताला काम देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पूर्ण करायचे आहे .येत्या वर्षभरात तालुका हिरवागार होणार आहे. तालुक्यात परंपरेनुसार घराणेशाही राजकरण होऊ देऊ नये. माझी शेवटची निवडणूक असल्याने सर्वांनी आपले पवित्र मत देऊन पाच वर्षे पुन्हा सेवा करण्याची संधी दिल्यास तालुक्याचा कायापालट करून दाखवू असे विचार आमदार शहाजीबापू पाटील यांनी सांगोला तालुक्यातील प्रचार सभेदरम्यान व्यक्त केले.

गुरुवार दिनांक ७ नोव्हेंबर रोजी सांगोला तालुक्यातील चिणके, वझरे, अनकढाळ, राजुरी , ह. मंगेवाडी, जुजारपूर, गुणापवाडी ,जुनोनी, पाचेगाव खुर्द ,चोपडी, नाझरा येथे प्रचारसभा घेण्यात आल्या . पुढे बोलताना शहाजीबापू पाटील म्हणाले ,तालुक्यातील बेरोजगारी संपवण्यासाठी एमआयडीसी आणण्याचे नियोजन आहे. उरलेले काम पूर्ण करण्यासाठी पुन्हा एक वेळ संधी द्या. तालुक्याचा दुष्काळी कलंक पुसण्यासाठी माझी राजकीय लढाई होती. शेतीला पाणी देण्यासाठी पाणी संघर्ष चळवळ उभा केली. तालुक्यातील एकही गाव पाण्यापासून वंचित ठेवले नाही. पाणीदार आमदार म्हणून बापूंची तालुक्यामध्ये व राज्यांमध्ये वेगळी ओळख निर्माण झाली आहे . टेंभू योजनेत बुद्धेहाळ तलावाचा समावेश केला . जल जीवन मिशन योजनेद्वारे तालुक्यातील प्रत्येक घराला पाणी देण्याचा संकल्प आहे . चोपडी गावात २१ कोटी ८८ लाखाची विकास कामे झाले आहेत.मतदार बंधू भगिनींनी मला भरघोस मतांनी विजयी करून तालुक्याचे व राज्याचे नेतृत्व करण्याची संधी द्यावी असे आवाहन आमदार शहाजीबापू पाटील यांनी प्रचारदौऱ्या दरम्यान केले.

यावेळी भाजपाचे तालुकाध्यक्ष दुर्योधन हिप्परकर, शिवाजी घेरडे, दीपक ऐवळे, राजू पाटील ,सोमनाथ ऐवळे, अजय सरगर ,चंद्रशेखर कवडगी ,तानाजी काटे, एन .वाय.भोसले सर ,सरपंच शोभा भुसनर, उपसरपंच पोपट यादव , ग्रामपंचायत सदस्य दिनेश बाबर, बापूराव यादव, इंजिनीयर एल. बी. केंगार, चेअरमन दगडू बाबर भाजपचे तालुका उपाध्यक्ष अनिल चौगुले, श्रीमंत सरगर, अजिंक्य शिंदे, विनायक बाबर, सचिन खळगे, भाजपचे महेश गुरव, लक्ष्मण चौगुले आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी शिवसेनेचे ज्येष्ठनेते विजयदादा शिंदे, भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत ,माजी जिल्हाध्यक्ष श्रीकांतदादा देशमुख, भाजपच्या नेत्या राजश्रीताई नागणे पाटील, शिवसेना तालुका प्रमुख दादासाहेब लवटे, सोमनाथ ऐवळे ,दादासाहेब वाघमोडे सर, ड. बंडू काशीद, माजी सभापती संभाजीतात्या आलदर , भीमराव घेरडे सर , नामदेव पाटील, आर. एस. बाबर सर ,आत्माराम काटे ,सचिन वाघमारे, नामदेव पाटील, समाधान भुसनर यांनी आमदार शहाजीबापू पाटील यांच्या प्रचारार्थ गावभेट दौऱ्यादरम्यान मनोगत व्यक्त केले.

त्यांनी सांगितले की बापूंनी सांगोला तालुक्याच्या विकासासाठी मोठे योगदान दिले आहे. परंतु या विधानसभा निवडणुकीत विरोधकांनी बापूंचा केसाने गळा कापला आहे. परंतु जनता या स्वार्थीपणाला माफ करणार नाही. आपले अनमोल मत वाया जाऊ न देता विकास करणाऱ्या व्यक्तिमत्त्वाला मत द्यावे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण करण्यामध्ये महायुती शासनाचा अनमोल वाटा आहे. आमदार शहाजीबापू पाटील हे तालुक्यामध्ये मोठी एमआयडिसी आणून तरुणांना रोजगार उपलब्ध करून देतील .बापूंनी ३५ वर्षे पाण्यासाठी व तालुक्याच्या विकासासाठी संघर्ष केला. स्व. आमदार गणपतराव देशमुख यांनी तालुक्यात कोणतेच मोठे भरिव काम केले नाही .महायुतीचा धर्म पाळून आमदार शहाजीबापू पाटील यांना एक संघपणे साथ देऊया . विकासाचे पर्व मतदारांच्या हातात आहे. शहाजीबापू पाटील यांना निवडून देऊन तालुक्याच्या राजकारणात पुन्हा एकदा संधी देऊया .आमदार झाल्यानंतर बापू महायुती शासनामध्ये निश्चितपणे नामदार होतील व तालुक्याचे भाग्य उजळेल. बापूंनी तालुक्याचा सर्वांगीण विकास करण्यासाठी रात्रीचा दिवस करून , ५ हजार कोटीहून अधिक निधी खेचून आणला .गेल्या ५५ वर्षात स्व.गणपतराव देशमुख यांनी पाण्यासाठी संघर्ष ही फाईल पुढे सरकवण्याचे धाडस केले नाही. परंतु गेल्या पाच वर्षाच्या काळात तालुक्यातील शेतीच्या व पिण्याचा पाण्याचा प्रश्न सोडवण्यात आमदार शहाजीबापू पाटील यशस्वी झाले. प्रचार सभेसाठी आमदार शहाजी बापू पाटील यांना प्रत्येक गावातून मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत होता. सभेसाठी मोठ्या प्रमाणात मतदार युवक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# सर्वसामान्य जनता हीच आबासाहेबांच्या विचारांची वारसदार विरोधकांनी बोलताना विचार करुन बोलावे- डॉ.बाबासाहेब देशमुख

## घेरडी येथे शेकापची जंगी कॉर्नरसभा संपन्न



सांगोला : विरोधक आता सांगत आहेत की बाबासाहेबाचे नाव मतदार यादीत आता आले, एवढ्यावरच न थांबता मतदानापूर्वीच माझ्या सारख्याची आई बहिण काढलेली आहे.ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे.३० वर्षे तुम्ही तालुक्याच्या राजकारणात काम करता, तुमच्या ३० वर्षातील ५ ठोस कामे दाखवा की त्या कामामुळे जनतेला फायदा झाला. त्यानंतर बघू मी कधी आलो आणि माझे नाव कधी आले असा सवाल डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी उपस्थित करून सर्वसामान्य जनता हीच आबासाहेबांच्या विचारांची वारसदार असल्याचे सांगून विरोधकांनी बोलताना विचार करुन बोलावे, असा सल्लाही त्यांनी दिला.

सांगोला विधानसभा मतदार सं घा ती ल म हा वि क ा स आघाडी–इंडिया अलायन्स पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार डॉ. बाबासाहेब आण्णासाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ घेरडी येथे भव्य कॉर्नरसभा संपन्न झाली. यावेळी डॉ.बाबासाहेब देशमुख बोलत होते.व्यासपीठावर डॉ.अनिकेत देशमुख यांच्यासह मित्रपक्षाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ.बाबासाहेब देशमुख म्हणाले, ९० व्या वर्षी आजारी असताना स्व. आबासाहेबांना मी मुंबईमध्ये दवाखान्यात घेऊन गेलो होतो. नव्वदाव्या वर्षी सुध्दा आबासाहेब स्वत:चे कपडे स्वत:धुवत होते हे मी पाहिले आहे, त्यांनी स्वत:च्या नातवाला सुध्दा कपड्याला हात लावू दिला नाही, त्यामुळे मी सेवा केली म्हणणाऱ्यांनी आपण काय बोलतो याचा विचार करावा असा उटोला लगावत शेवटच्या काळामध्ये दृष्टी कमी झाली होती. चालत असताना सुध्दा कोणाच्या तरी हाताला धरुन आधार घेतला नाही, आयुष्यभर आबांनी स्वावलंबी जीवन जगले, त्यामुळे तुम्ही कसली सेवा केली? असा सवाल उपस्थित केला. पाण्यासाठी संघर्ष करावा लागतो, एवढे सोप्यात पाणी आले नाही, असे सांगत टेंभू म्हैसाळ योजनेचे पाणी २०१९. पूर्वीच आले. आणि त्या पाण्याच्या माध्यमातून तालुक्यातील ७० टक्के जमीनी ओलिताखाली आल्या, पाणी आणण्यासाठी आबासाहेबांनी व स्व.नागनाथआण्णांनी जनतेला सोबत घेऊन ३० वर्षे पाणी परिषदा घेतल्या आणि त्यानंतर पाणी आले असल्याचे त्यांनी ठणकावून सांगितले. विकास हा विद्यमान लोकप्रतिनिधींच्या खिशात आहे.

यावेळी विविध गावातील प्रस्थांपिताकडून दिलेला बोगस निधी वाचून दाखवित त्यांनी केलेला विकास आता आपल्या शोधण्याची वेळ आली आहे. विकास हा विद्यमान लोकप्रतिनिधींच्या खिशात आहे. हा खिसाच फाडायचे काम सांगोला तालुक्याची जनता आता नक्कीच करेल, असे सांगतडॉ.बाबासाहेब देशमुख यांना बहुमताने विजयी करा.असे डॉ.सुदर्शन घेरडे यांनी सांगितले. यावेळी अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी तरुण कार्यकर्ते, महिला, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# फॅबटेक सिव्हील इंजिनिअरिंग मध्ये स्टॅड प्रो सॉफ्टवेअर प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न



सांगोला : फॅबटेक टेक्नीकल कॅम्पस, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अॅड रिसर्च, सांगोला सिव्हील विभागांतर्गत स्टॅड प्रो सॉफ्टवेअर प्रशिक्षण व विद्यार्थी विकास कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळीप्रा.पराग देशमुख (संचालक, कॅडडेस्क बालाजीनगर, पुणे ) यांनी विद्यार्थ्यांना स्टॅड प्रो सॉफ्टवेअर या विषयावर मार्गदर्शन केले. प्रा. पराग देशमुख यांनी सिव्हील इंजिनिअरींग क्षेत्रात काम करत असताना स्टॅड प्रो सॉफ्टवेअर चे ज्ञान असणे गरजेचे असते, असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले . हा कार्यक्रम संस्थेचे चेअरमन श्री.भाऊसाहेब रुपनर व मॅनेजिंग डायरेक्टर डॉ.अमित रुपनर, कार्यकारी संचालक श्री.दिनेश रूपनर, व्यवस्थापक प्रतिनिधी प्राजक्ता रुपनर, कॅम्पस डायरेक्टर डॉ. संजय अदाटे, यांच्या मार्गदर्शनाखाली, प्राचार्य डॉ.रविंद्र शेंडगे, डीन अँकॅडमीक डॉ. शरद पवार , सिव्हील विभाग प्रमुख प्रा. माळी एस.एम, ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट ऑफीसर प्रा. धनंजय शिवपूजे, डॉ.विद्याराणी क्षीरसागर कार्यक्रमाचे समन्वयक प्रा.सचिन शेंडगे ,यांच्या सह सिव्हील इंजिनिअरिंग विभागातील सर्व प्राध्यापक उपस्थितीत संपन्न झाला .

निर्भिड व सडेतोड बातम्या
नियमित वाचा...
साप्ताहिक माणदेश वार्ता

माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष–४२ वे अंक–१ ला मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# सांगोला विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार आ.शहाजीबापू पाटील यांच्या प्रचारार्थ, अंबिका मंदिरात नारळ फोडून सांगोला शहरात प्रचाराचा शुभारंभ

सांगोला : प्रतिनिधी २५३ सांगोला विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार शहाजीबापू पाटील यांच्या प्रचारार्थ सांगोल्याचे ग्रामदैवत अंबिकादेवीचे दर्शन घेऊन , नारळ फोडून शुक्रवार दिनांक ८ नोव्हेंबर रोजी प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला . आमदार शहाजीबापू पाटील यांनी पाच वर्षात तब्बल ५ हजार कोटीची विकास कामे करून तालुक्यामध्ये विकासाचा डोंगर उभा केला. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीसाठी आमदार शहाजीबापू पाटील हे महायुतीकडून निवडणूक लढवत असून शहरात प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला .




सांगोला शहरातील प्रचार शुभारंभ प्रसंगी शिवसेनेच्या महिला तालुकाप्रमुख राणीताई माने, महिला शहर प्रमुख छायाताई मेटकरी, शिवसेना महिला शहरउपप्रमुख लतिका मोटे, महिला शहर समन्वयक शोभाकाकी घोंगडे, राजलक्ष्मीताई पाटील, राणीताई पाटील, शांताताई हाके,माजी नगराध्यक्ष नवनाथ भाऊ पवार, शिवसेना शहर उपप्रमुख विजय इंगोले आदी मान्यवरांच्या हस्ते अंबिकादेवीचे दर्शन घेऊन श्रीफळ वाढवून प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रचार शुभारंभ प्रसंगी शिवसेना सांगोला शहर संघटक आनंदाभाऊ माने, शहराध्यक्ष माऊली तेली, उद्योगपती आनंद घोंगडे, शिवसेना शहर उपप्रमुख अस्मिर तांबोळी, शिवसेना शहर समन्वयक अरुण बिले, युवासेना शहर प्रमुख समीर पाटील, शहर उपप्रमुख सुजित भोकरे, काशिलिंग गाडेकर, सागर नरूटे, एससी सेल उपप्रमुख राजेंद्र बनसोडे, शिवसेना शहर उपप्रमुख सोमेश्वर यावलकर, शिवसेना शहर सहसंघटक अरुण पाटील, शिवसेना सह समन्वयक अच्युत फुले, शिवसेना शहर प्रमुख ओबीसी सेलचे आयुब मुलाणी, शिवसेना शहरसंघटक ओबीसी सेलचे प्रभाकर घोंगडे ,शिवसेना शहर संघटक रुकसाना मुजावर, प्रसिद्धी प्रमुख छोटू दौंडे, मायाका प्रतिष्ठानचे अध्यक्ष काशिलिंग गावडे, भाजपचे डॉ. मानस कमलापूरकर, प्रवीण जानकर, आनंद दौंडे, प्रवीण इंगोले, राजेश खडतरे, गणेश धतिंगे, सचिन पुणेकर शिवाजी गावडे, स्वप्निल कांबळे, आसपाक मुलाणी , रोहित गेजगे, राहुल चौधरी, शैलेश पवार, राहुल गेजगे,बिरा खांडेकर ,सुजित जोशी, गणेश चव्हाण, दादा चव्हाण, अतुल गरंडे, पारस डांगे, दीपक जानकर, तोहिद शेख, सोहेल इनामदार ,आकाश घोंगडे, सुरेश जाधव, आशिष जाधव ,अक्षय महिमकर, आनंद बनसोडे ,शरद गावडे ,आदिनाथ नरूटे, पिंटू सादिगले, मदनराज मदने ,योगेश साळुंखे ,आतिक मुजावर, ऋषी जानकर आदी पदाधिकारी ,कार्यकर्ते, मान्यवर व मतदार बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी सांगोला शहरातील अहिल्यानगर, इंदिरानगर, वजराबादपेठ लोहार गल्ली, बुरुडगल्ली, गोंधळगल्ली, भारतगल्ली, सनगरगल्ली, साठेनगर, यश नगर व विद्यानगर या ठिकाणी होम टू होम प्रचार करण्यात आला. महायुतीच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांकडून मतदारांना मतपत्रिका नमुना दाखवून धनुष्यबाणाच्या चिन्हासमोरील बटन दाबून आमदार शहाजीबापू पाटील यांना विजयी करावे असे आवाहन करण्यात आले.


२४ तास ॲम्ब्युलन्स सेवा

विजय-लक्ष्मी कार्डिॲक ॲम्ब्युलन्स सर्व्हिस

AC/NON AC योग्य दरात उपलब्ध

Vijaylaxmi Cardiac Ambulance

AC/NON AC



संपर्कः- 7276070722

सांगोला शहरात ५ मिनिटात हजर

9821569005
9076041977
9890218146

☑ Home Loan
☑ Personal Loan
☑ Education Loan
☑ Vehicle Loan

Mahalaxmi Finance Services.

All types of loan available here


# मतदान होण्या अगोदरच सर्वसामान्यांवर दादा गिरीची भाषा; मतदानानंतर काय होणार?

## गावभेट दौऱ्यात डॉ.बाबासाहेब देशमुख यांचा सवाल



सांगोला : विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सांगोल्यात सुरू असताना मतदान होण्याअगोदरच सध्या सांगोल्यात ठराविक उमेदवारालाच मतदान केले पाहिजे अशी दंडेलशाही व दादागिरीची भाषा वापरली जात आहे. स्व. आबासाहेबांनी सर्वसामान्य जनतेने सुखाने आनंदाने आणि भयमुक्त जीवन जगण्यासाठी फार मोठे कष्ट केले असून दमदाटीचे राजकारण गेल्या ६० वर्षात कधीही घडले नाही. या पुढील काळातही दमदाटी, गुंडगिरीचे राजकारण होणार नाही याची दक्षता मी पुरेपूर घेणार असून कोणाच्याही केसाला सुद्धा हात लावू देणार नाही असा विश्वास देत निवडणुकी अगोदरच सांगोल्यात दंडेलशाही, दमदाटी व दादागिरी ची भाषा केली जात आहे तर निवडणुकीनंतर काय परिस्थिती असेल असा सवाल शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार डॉ. भाई बाबासाहेब देशमुख यांनी गाव भेटीदरम्यान उपस्थित करून सध्याच्या चुकीच्या व घाणेरड्या राजकारणावर चिंता व्यक्त केली.

सांगोला विधानसभा मतदार संघाचे महाविकासआघाडी-इंडिया अलायन्स पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार डॉ. बाबासाहेब आण्णासाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ शुक्रवार (दि.८) रोजी डोंगरगाव, गळवेवाडी, आगलावेवाडी, भोपसेवाडी येथे गाव भेट दौरा संपन्न झाल्या. यावेळी मार्गदर्शन करताना शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार डॉ.बाबासाहेब देशमुख बोलत होते.

पुढे बोलताना डॉ. बाबासाहेब देशमुख म्हणाले की, गेल्या पाच वर्षात सांगोल्यातील दोघांनी टक्केवारी घेऊन स्वतःचा विकास केला. स्वतःचा विकास करत असताना गोरगरीब, सर्वसामान्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले. गेल्या ५ वर्षात अनेक चुकीच्या गोष्टी राबवल्या, त्याचप्रमाणे अवैद्य धंद्यांना मोठ्या प्रमाणात पाठिंबा दिला गेला. त्यामुळे तरुण वर्ग देशोधडीला लागला असून भरकटला गेला आहे. स्व. आबांनी पुरोगामी विचार जपला, निष्ठेने काम केले, त्याचप्रमाणे वंचित घटकांना न्याय देण्यासाठी आयुष्यभर संघर्ष केला त्यामुळे स्वाभिमानी विचारासाठी शेतकरी कामगार पक्षाला मतदान करणे गरजेचे आहे. स्व. आबासाहेब हे अधिवेशनाअगोदर प्रत्येक गावात जाऊन सर्वसामान्य नागरिकांसह शेतकरी बांधवांच्या अडीअडचणी समजून घेत होते. आणि त्यानंतर अधिवेशनात प्रश्न मांडून निकालही काढायचे. आताची परिस्थिती मात्र वेगळी असून विकासाच्या गप्पा मारणारे लोक गोरगरीब, दिनदलित, शेतकरी बांधवांच्या अडीअडचणी जाणून घेण्यासाठी किती वेळा गावात आले याचा विचार करणे गरजेचे झाले आहे. ज्या राजकारणी लोकांना गोरगरीब, दिनदलीत, कष्टकरी नागरिकांचे प्रश्न समजून घेण्यासाठी वेळ नाही किंवा गोरगरिबांच्या अडचणीचे जाण नाही अशा लोकांना का मतदान करायचे असा सवाल उपस्थित करून गोरगरीब दिनदलित वंचित घटकांना न्याय देण्यासाठी माझ्या शिटी या चिन्हा समोरील बटन दाबून बहुमताने विजयी करा असे आवाहन त्यांनी केले. शेतकरी कामगार पक्षाचे अधिकृत उमेदवार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांना निवडणूक शिट्टी चिन्हं बहाल करण्यात आले आहे. चिन्ह मिळाल्यापासून तालुक्यात सर्वत्र शिट्टीचा आवाज घुमू लागला आहे. लहान मुलापासून ते वयोवृद्ध नागरिकांकडे शिट्टी दिसून येत असून शिट्टीचा आवाज मोठ्या प्रमाणात घुमू लागल्यामुळे प्रस्थापितांच्या पायाखालची वाळू सरकली असल्यामुळे सर्वसामान्यांवर दादागिरीची भाषा केली जात आहे. दादागिरी ची भाषा २३ नोव्हेंबर पर्यंत करता येईल त्यानंतर मात्र दादागिरी, दंडेलशाहीची भाषा पूर्णपणे बंद होईल.

# तरंगेवाडी, भोपसेवाडी, आगलावेवाडीत शेकापला तडे कार्यकर्ते गेले दिपकआबांकडे..!

## शेकापच्या शेकडो कार्यकर्त्यांचा दिपक आबांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश



सांगोला : प्रतिनिधी एकीकडे विधानसभेची रणधुमाळी सुरू असताना दुसरीकडे शेकापमधील सध्याचे नेतृत्व पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्याला विश्वासात घेत नसल्याने तसेच अंतर्गत गटबाजीला कंटाळून सांगोला तालुक्यातील तरंगेवाडी, भोपसेवाडी, आगलावेवाडी येथील शेकापच्या कार्यकर्त्यांनी दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश करून ठाकरेंची धगधगती मशाल हाती घेतली आहे.

शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरेंच्या उपस्थितीत दिपकआबा साळुंखे पाटील यांनी शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर ठाकरेंच्या मशालीची सर्वात जास्त धग शेकापला जाणवली आहे. विधानसभेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून महाविकास आघाडीची अधिकृत उमेदवारी दिपकआबा साळुंखे पाटील यांना जाहीर झाल्यानंतर शेतकरी कामगार पक्षाला मोठी गळती लागली आहे. एक–एक करत अनेक नेते, पदाधिकारी कार्यकर्ते अखेरचा रामराम करीत पक्ष सोडून दिपकआबांच्या नेतृत्वाखाली काम करण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश करीत आहेत. तरंगेवाडी, भोपसेवाडी, आगलावेवाडी येथील गावातील शेकापच्या कार्यकर्त्यांनी अखेरचा रामराम करीत दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून उध्दव ठाकरेंच्या शिवसेनेत प्रवेश करीत आहेत.

विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना सांगोला तालुक्यातील तरंगेवाडी येथील सचिन खांडेकर, भाऊसाहेब आगलावे, अमोल गरंडे, भोपसेवाडी येथील विलास बाबा वगरे, सुरेश नरळे, प्रशांत आगलावे, संतोष नरळे, कोंडीबा नरळे, सुशांत नरळे, गोरख नरळे, आबासो नरळे, भगवान कोळेकर तसेच आगलावेवाडी येथील प्रकाश मोहिते, रामा खुळे, शिवाजी माळी, स्वप्निल माळी, वैभव श्रीराम, रामचंद्र आगलावे, अंकुश बुरंगे या कार्यकर्त्यांनी शेकाप पक्षाला अखेरचा रामराम ठोकत दिपकआबांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश करून ठाकरेंची मशाल हाती घेतली.

# १३ नोव्हेंबर पासून होम वोटींगचा कार्यक्रम

## सांगोला मतदारसंघासाठी ३०९ मतदान केंद्रावर मतदान घेण्यात येणार

सांगोला : उसांगोला विधानसभा मतदार संघासाठी एकूण ३ लाख ३३ हजार ४९३ मतदार असून १ लाख ७२ हजार ७०४ पुरुष मतदार १ लाख ६० हजार ७८४ स्त्री मतदार व ५ इतर मतदार असून या साठी ३०९ मतदान केंद्रावर मतदान घेण्यात येणार असल्याचे तहसीलदार तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी संतोष कणसे यांनी सांगितले. घरीबसुन मतदान करणारे ८५ वय वर्ष असणारे ६५९. लोकांनीच १२ डी फॉर्म भरून दिला असून ७१ दिव्यांग बांधव यानी होम वोटींग साठी फॉर्म भरला आहे व कांहीनी मतदार केंद्रावर मतदान करणार असल्याचे सांगीतले आहे. होम ओटींग चा कार्यक्रम दिनांक १३ नोव्हेंबर २४ ते १६ नोव्हेंबर २४ या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे.त्यासाठीची सर्व तयारी पूर्ण झाली असून त्यासाठी १३ रूट तयार केले आहेत सैनिक मतदार ८८६ असून टपाली मतदार ३००० आहेत ह्यांचे मतदार ३ दिवस अगोदर पुर्ण करण्यात येईल अशी माहिती संतोष कणसे यांनी दिल्याचे मिडीया नोडल अधिकारी मिलिंद सावंत यांनी दिली आहे.

